Literacy for a Billion

Movie: Devi karlyachi Ekvira
Year: 2009

Song: Aarti ekvira
Lyricist:

आरती एकविरा
आई देई मज वरा
चरण मी तुज लागे
देई दर्शन पामरा
आरती एकविरा
आई देई मज वरा
आरती एकविरा

कार्ला घरी वास तुझा
भक्त सह्याद्रीच्या पायी
पूर्व दृष्टीने पाहून
सांभाळी त्या लवलाही
आरती एकविरा
आई देई मज वरा
आरती एकविरा

चैत्राच्या शुद्ध पक्षी
जेव्हा उत्सव तव होई
भक्तगण मेळ काठी
पालखी ते मिरविती
आरती एकविरा
आई देई मज वरा
आरती एकविरा

दर्यावरचे शूर वीरा
तुझ्या पायी ते चाकर
तव तूच तारी त्यासी
त्यांना एकची आधार
आरती एकविरा
आई देई मज वरा
आरती एकविरा

सप्त नक्षत्राचा वारा
कुठे जीवालाही थारा
क्षण तुज आठविता
त्यांना तारीसी तू माता
आरती एकविरा
आई देई मज वरा
आरती एकविरा

तव पुजनी जे रमती
मनोभावे स्मरूनी चित्ती
तडे संकटास नेई
कडाडून प्रकट होसी
आरती एकविरा
आई देई मज वरा
आरती एकविरा

शांत होई तुष्ट होई
सेवा मान्य करी आई
अभयाच्या देई वरा
ठेवितो मी चरणी शिरा
आरती एकविरा
आई देई मज वरा
शरण मी तुज लागे
देई दर्शन पामरा
आरती एकविरा
आरती एकविरा

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*

आई देई मज वरा
आरती एकविरा
आरती एकविरा
आई देई मज वरा
आरती एकविरा
आरती एकविरा
आई देई मज वरा

आरती एकविरा
आरती एकविरा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*